Arunodaya Dnyan Prasarak Mandal's

**Women's College of Arts, Commerce and Home Science Jalgaon**

**National Seminar on 'Re-forming College Library Services with ICT'**

**Report**

ADPM's Women's College of Arts, Commerce and Home Science, Jalgaon on the occasion of silver jubilee year, organized UGC Sponsored a national seminar on 'Re-forming College Library Services with ICT' on 26 and 27 March, 2015.

Prof. V. J. Chaudhari chaired the inaugural function Prof. S. D. Chaudhari inaugurated the session and Dr. S. K. Patil delivered the keynote address. Principal Dr. S.N. Bharambe Vice-Principal Dr. K. H. Nehete were present at occasion. Dr. Vinay Patil put the objectives of this organization in his introductory speech. Prof. S. D. Chaudhari stated that development of technology has affected the use of library. We all should try to bring the readers back to library. Prof. V. J. Chaudhari in his speech said that, 'a library is a temple and books are the deities.' He said that we should bring together the technology and the old teaching methods. Prof. Prakash kamble introduced the function and Dr. P. B. Mahajan put the vote of thanks.

Dr. S. K. Patil former librarian of Jaikar Library, Savitribai Phule University, Pune in his keynote speech said that in the world of information technology the web of information is being knit and the information should be well collected, stored and make available with proper management. According to him the role of library has become crucial.

The librarian of National Chemical Laboratory, Pune, Dr. Nandkumar Dahibhate chaired the first session. There were twenty research papers were presented in this session Dr. U. P. Nahle was the chairperson of second session and twenty two research papers were presented in this second session. Bothe the chairpersons addressed the participants and had discussion on the presented research papers.

On the second day of seminar eighteen, research papers were presented. Dr. Dilip Deshmukh, P.O. Nahata College, Bhusawal was the chairperson of the session. Prof. Kishor Ingle, Tata Consultancy Services Information Center, delivered his learned speech on the modern library services and challenges.

In the afternoon session eight research papers were presented. Dr. Mohan Kherde, librarian, S G Amravati University chaired the session and delivered his speech on UGC and Library Profession.

WOMEN'S COLLEGE OF ARTS, COM. & HOME SCI. JALGAON
R-NAAC Accredited

Principal
A.D.P.M's Women's College of Art's, Com. & Home Sci. Jalgaon

The valedictory function was took place in the presence of Dr. D. R. Deshpande. Dr. Dharmavir, librarian Dr. B.A.M University, was the chief guest of the function. The participants in the seminar were form Maharashtra, Gujrat, Rajesthan and Madhya Pradesh. Total 97 participants were actively participated in this seminar.

WOMEN'S COLLEGE OF ATR'S. COM. & HOME SCI. JALGAON
R-NAAC Accrediated

Principal
A.D.P.M's Women's College of
Art's, Com. & Home Sci. Jalgaon

2014-15 (3)

: एक
त्राचा अहवाल

दुसऱ्या दिवशी चौथ्या
ाविद्यालय, औरंगाबाद
यांनी 'स्त्रीभ्रूण हत्या
ीकरण' या विषयावर
. केले. कार्यक्रमाचे
रुलकर यांनी भूषविले.
प्रा.डॉ. उषा सपकाळे

स्थान उ.म.वि. येथील
शांताराम बडगुजर यांनी
दहा निबंधांचे वाचन
कडुसकर यांनी देखील
ृती करण्याचे आवाहन
एन.जी.ओ. सदस्य,
ांचे वाचन केले. डॉ.
्रसंचालन व आभार

प्रसंगी अरुणोदय ज्ञान
एन.व्ही. भारंबे सर होते
.डी.टी. विद्यापीठाच्या
ष्ठाता मा.डॉ. स्मृती
ूत्रसंचालन प्रा. प्रकाश
ॉ. साधना जावळे यांनी
ाचे प्राचार्य डॉ. सं.ना.
नेहेते उपस्थित होते.
ण ४५ शोधनिबंध प्राप्त
नंबर असलेले पुस्तक
]



# 'माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाविद्यालयीन ग्रंथालय सेवेची पुनर्रचना' राष्ट्रीय चर्चासत्र अहवाल

अरुणोदय ज्ञानप्रसारक मंडळ संचलित, कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय (एस. एन.डी.टी.) जळगाव रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त ग्रंथालय व माहिती केंद्रातर्फे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहकार्याने द्विदिवसीय "Re-forming College Library Services with ICT" 'NS-RCLS' (माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाविद्यालयीन ग्रंथालय सेवेची पुनर्रचना) या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे दि. २६ व २७ मार्च २०१५ रोजी आयोजन केले होते.

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मा.प्रा.व्ही.जे. चौधरी, उद्घाटक संस्थेचे चेअरमन प्रा. एस.डी. चौधरी, बीजभाषक प्रा.डॉ. एस.के. पाटील, प्राचार्य डॉ. सं. ना. भारंबे, उपप्राचार्य डॉ. किशोर नेहेते व चर्चासत्राचे सचिव डॉ. विनय पाटील उपस्थित होते. सुरुवातीला प्रास्ताविकात डॉ. विनय पाटील यांनी चर्चासत्राच्या आयोजनामागची भूमिका विषद केली. उद्घाटनपर भाषणात डॉ. एस.डी. चौधरी यांनी ग्रंथालयाचे गांभीर्य तंत्रज्ञानामुळे कमी झाले आहे. या तंत्रज्ञानामुळे वाचन संस्कृती कमी होत आहे. यासाठी ग्रंथालयांनी विद्यार्थी वाचनाकडे कसे वळतील यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे, असे स्पष्ट केले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.व्ही.जे. चौधरी यांनी ग्रंथालयाचे महत्त्व स्पष्ट करताना ग्रंथालय म्हणजे मंदिरातील देवाचा गाभारा आहे, असे म्हटले. तसेच वाचन संस्कृती जागृत करण्यासाठी जुन्या शिक्षण पध्दतीचा व नवीन तंत्रज्ञानाची योग्य सांगड घालणे आवश्यक आहे, असे ते पुढे म्हणाले. उद्घाटनाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश कांबळे तर आभार डॉ. प्रभावती महाजन यांनी मानले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील बॅ. जयकर ग्रंथालयाचे माजी ग्रंथपाल व सध्या सिंबॉयसीस या आंतरराष्ट्रीय संस्थेचे ग्रंथपाल प्रा.डॉ. एस.के. पाटील यांनी 'माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाविद्यालयीन ग्रंथालय सेवेची पुनर्रचना' या द्विदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या बीजभाषणप्रसंगी या तंत्रज्ञानाच्या युगात जगभर माहितीचे जाळे विणले जात असताना या माहितीचे योग्य रितीने संकलन, नियोजन व व्यवस्थापन करून उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध करुन देण्याची गरज आजच्या ग्रंथपालांसमोरील खऱ्या अर्थाने असल्याचे प्रतिपादन केले.

प्रथम सत्राच्या अध्यक्षस्थानी भारतातील नामांकित संशोधन संस्था (NCL) नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पुणे या संस्थेचे ग्रंथपाल, डॉ. नंदकुमार दहीभाते उपस्थित होते. या सत्रात एकूण २० शोधनिबंधांचे सादरीकरण करण्यात आले. दुपारच्या सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. यु.पी. नाल्हे यांनी भूषविले. या सत्रात आमंत्रित विशेष व्याख्याते डॉ. नंदकुमार दहीभाते यांनी 'माहिती तंत्रज्ञानात ग्रंथालय सेवेचे विपणन' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. या सत्रात एकूण २२ शोधनिबंधांचे सादरीकरण झाले.

राष्ट्रीय चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवशी पहिल्या



2014-15

COLLEGE OF ART'S, COM. & HOME SCI. JALGAON
B-NAAC Accredited
WOMEN'S

Principal
A.D.P.M's Women's College of
Art's, Com. & Home Sci. Jalgaon

सत्रात एकूण १८ शोधनिबंधांचे वाचन झाले. सत्राच्या अध्यक्षस्थानी भुसावल येथील पी.ओ. नाहाटा महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. दिलीप देशमुख तर प्रमुख वक्ते म्हणून संगणक सेवेत आपला जगभर ठसा उमटवणारी T.C.S. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हीसेस इन्फॉर्मेशन सेंटर येथील प्रा. किशोर इंगळे यांचे विशेष आमंत्रित व्याख्यान झाले. यात त्यांनी ग्रंथपालांना उद्देशून नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती मिळवून त्यांची अंमलबजावणी करावी असे प्रतिपादन केले. मुंबई येथील प्रा. परीता देसाई यांनी 'रिइंजिनिअरींग स्ट्रॅटेजीस फॉर कॉलेज लायब्ररी', प्रा. जॉनिस फर्नांडीस, मुंबई यांनी 'इम्पॅक्ट ऑफ ॲक्रीडीटेशन ऑन इन्फॉर्मेशन सर्विसेस ऑफ इंजिनिअरींग कॉलेज लायब्ररी', प्रा. राहुल खंदारे यांनी 'युजर्स फ्रीडम ॲण्ड इव्हॅल्युएशन ऑफ इन्फॉर्मेशन सर्विसेस : अ सर्व्हे', प्रा. जितेंद्र गावीत यांनी 'ॲप्लिकेशन ऑफ आय.टी.सी. इन कॉलेज लायब्ररीज : नीड ऑफ द अवर', प्रा. आर.सी. पाटील यांनी 'इम्पॅक्ट ऑफ इंटरनेट इन कॉलेज लायब्ररी', प्रा. आरती चौधरी यांनी 'सोशल नेटवर्कींग साईटस् युज इन कॉलेज लायब्ररीज', प्रा. उदय महाजन यांनी 'मॉडेल्स इन इन्फॉर्मेशन सिकींग बिहेवीरल रिसर्च', प्रा. हितेश ब्रिजवासी यांनी 'डीजीटल लर्निंग रिसोर्स सेंटर-अ स्टडी' या विषयांवर शोधनिबंध सादर केलेत.

राष्ट्रीय चर्चासत्राच्या दुसऱ्या दिवशी दुपारच्या सत्रात एकूण ८ शोधनिबंधांचे वाचन झाले. सत्राच्या अध्यक्षस्थानी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे ग्रंथपाल प्रा.डॉ. मोहन खेरडे यांचे विशेष आमंत्रित व्याख्यान झाले. त्यांनी 'युजीसी व लायब्ररी प्रोफेशन' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय द्विदिवसीय चर्चासत्राचा समारोप नागपूर येथील डॉ. डी.आर. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखा[ली] संपन्न झाला. याप्रसंगी औरंगाबाद येथील ड[ॉ.] बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाती[ल] ग्रंथपाल व आजच्या समारोपाचे प्रमुख वक्ते ड[ॉ.] धर्मवीर वीर यांनी एकूणच सर्व सत्रांचे विश्लेषण के[ले] व चर्चासत्राची उपयुक्तता स्पष्ट केली. याप्रसंगी ड[ॉ.] महानतेश अजगोंड, प्रा. जेनिस फर्नांडीस यां[नी] सत्रासंबंधी आपले अभिप्राय मांडले. याप्रसंगी प्रमु[ख] पाहुणे म्हणून अमरावती येथील प्रा.डॉ. मोहन खे[रडे] उपस्थित होते.

या राष्ट्रीय चर्चासत्रात गुजरात, महारा[ष्ट्र,] राजस्थान व मध्यप्रदेशातील तज्ज्ञ, संशोधका[ंचे] शोधनिबंध प्राप्त झाले असून सुमारे ९० ते १० प्राध्यापक व संशोधक उपस्थित होते. राष्ट्री[य] चर्चासत्राच्या आयोजनात महाविद्यालयातील कु. नु[...] जैन, कु. सपना बारी, कु. मयुरी पाटील, [...] सरस्वती बारी, कु. सोनम पाटील या विद्यार्थिनीं[नी] उत्कृष्ट भूमिका बजावली. वर्तमानकाळामध्ये अ[...] गुणी व हुशार विद्यार्थी अतिशय दुर्मिळ झा[ले] असताना या महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थि[नी] शिस्तप्रिय व कामसू आहेत, अशा शब्दात उपस्थि[त] संशोधक प्राध्यापकांनी या स्वयंसेवक विद्यार्थिनीं[चे] कौतुक केले. समारोपाचे सूत्रसंचालन प्रा. वृषा[ली] कोल्हे तर आभार डॉ. विनय पाटील यांनी मान[ले.] कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयात[ील] प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी सहक[ार्य] केले.

❑❑❑



Principal
K.C.E.S.'s... D.P.M.'s Women's College of Arts, Com. & Home Sci. Jalgaon
R-NAAC Accredited

2014-15

व उपयोजन)
त्रे

करताना संस्थेचे सचिव मा.प्रा. अे.पी.
डॉ. प्रभावती महाजन, उपप्राचार्य डॉ.
चे चेअरमन मा.श्री. एस.डी. चौधरी,
भारंबे, बीजभाषक श्री. संजय भास्कर



महा ांच्या अध्यक्षतेखाली 'ग्रंथ ते
ळयावरील शोधनिबंधावर चर्चा करताना
उपस्थित डॉ. प्रकाश सपकाळे.



कुसुमाई

# माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाविद्यालयीन ग्रंथालय सेवेची पुनर्रचना - राष्ट्रीय चर्चासत्रातील क्षणचित्रे



चर्चासत्राचे उद्घाटन करताना संस्थेचे चेअरमन मा.श्री. एस.डी. चौधरी सर, डावीकडून उपस्थित डॉ. विनय पाटील, उपप्राचार्य डॉ. किशोर नेहेते, जयकर ग्रंथालयाचे माजी व सिंबॉयसिस ग्रंथालयाचे ग्रंथपाल डॉ. एस.के. पाटील, प्रा. व्ही. जे. चौधरी, प्राचार्य डॉ. सं.ना. भारंबे.



चर्चासत्राचे बीजभाषक मा.डॉ. एस.के. पाटील, पुणे येथील बॅ. जयकर ग्रंथालयाचे माजी ग्रंथपाल व सिंबॉयसिस या आंतरराष्ट्रीय ग्रंथालयाचे ग्रंथपाल.



ग्रंथालयातील MOPAC चे उद्घाटन प्रसंगी डावीकडून डॉ. विनय पाटील, प्राचार्य सं.ना. भारंबे, मा.श्री. एस.डी. चौधरी, मा.प्रा. व्ही.जे. चौधरी, मा.डॉ. एस.के. पाटील, उपप्राचार्य डॉ. किशोर नेहेते.




डॉ. दिलीप देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली TCS येथील मा. किशोर इंगळे मार्गदर्शन करताना व उपस्थित रवींद्र मेढे.

२०१४-१५

कुसुमाई

R-NAAC Accredited

Principal
A.D.P.M's Women's College of
Arts, Com. & Home Sci. Jalgaon